## ⁂ विवेकानंद संस्थेने जपली सामाजिक बांधिलकी आणि सुसंस्काराचा वसा ⁂

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने आपले ब्रीदवाक्य सार्थ करीत सामाजिक बांधिलकी जोपासत सुसंस्काराचा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेतील सर्व सेवकांनी आपला एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री दुष्काळ निधीमध्ये जमा करून रूपये ५२,२६,११३/- (अक्षरी रूपये बावन्न लाख सव्हिस हजार एकशे तेरा फक्त) निधी दिल्याबद्दल मी संस्थेचे अध्यक्ष नामदार चंद्रकांत (दादा) पाटील व कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे तसेच संस्थेतील सर्व सेवकांचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आभार व्यक्त करतो. आणि संस्थेच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देतो असे गौरव उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.नामदार देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे बोलताना काढले.

मागील वर्षीच्या दुष्काळ आणी नापिकीने अनेक शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग अवलंबावा लागला. या नैसर्गिक आपत्तीमधून बाहेर पडण्यासाठी मोठ्या आर्थिक तरतूदीची गरज असलेने मा.मुख्यमंत्री यांना दुष्काळ निधीला भरगोस मदत करण्याचे आवाहन जनतेला केले होते. या आवाहनास सकारात्कम प्रतीसाद देत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी संस्थेच्या सर्व विभागीय बैठकीमध्ये संस्थेच्या सेवकांना आवाहन केले. या आवाहनानुसार संस्थेतील सर्व सेवकांनी एक दिवसाचा पगार दुष्काळ निधीसाठी जमा केला. हा निधी मा.मुख्यमंत्री यांना संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री मा.नाम.चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या उपस्थित प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सुपूर्त केला. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजिव सेवक मंडळाचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ हजर होते. संस्थेच्या या चांगल्या उपक्रमाचे कौतूक करणेसाठी स्वतः मुख्यमंत्री यांनी याप्रसंगाचा फोटो व बातमी आपल्या फेसबुक अकौंटवर टाकून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सर्व सेवकांचे आभार मानले व संस्थेस धन्यवाद दिले.